# <u>उल्हासनगर महानगपालिका, उल्हासनगर</u>

मालमत्ता कर विभाग युनिट क्र. 5
दिनांक : 13/02/2024

विषय:- उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005918900 अन्वये नोंद श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा हि नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे पेसुमल गोकलदास हि नोंद पुर्ववत करणेबाबत.

संदर्भ :- सौ. रिधी एच. पुरस्वानी यांचा दि. 15/09/2023 रोजीचा अर्ज.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005918900 अन्वये **पेसुमल गोकलदास** अशी नोंद होती. तदनंतर श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा यांनी नाव हस्तांतरण अर्ज व नोंदणीकृत कागदपत्र सादर केले आहेत.

सदर अर्जाच्या व सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे जा.क्र. उमपा/यु. क्र. 5/245/2022 दि. 18/07/2022 रोजीचे आदेशानुसार सदर मिळकतीकरीता श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा अशी नोंद करण्यात आली आहे.

तद्नंतर सौ. रिधी एच. पुरस्वानी रा- बॅरेक नं. 823 रुम नं. 22/23,सेक्शन-17 उल्हासनगर-3 यांचे दि. 15/09/2023 (अर्ज प्राप्त दि. 16/10/2023) रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीसंदर्भात चोपडा कोर्ट, उल्हासनगर न्यायालयात Regular Civil Suit No. 38/2009 Exh No. 62 नुसार दावा प्रलंबित आहे. तसेच श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा (श्रीम. रिधी एच पुरस्वानी यांचे नातेवाईक) यांनी खोटे, बनावट कागदपत्रांच्या आधारे सदर मिळकत त्यांचे नावावर करुन घेतली आहे. तरी मालमत्ता क्र. 31CO005918900 अन्वये श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा या नावाची नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे त्यांचे आजोबा **पेसुमल गोकलदास** यांचे नावे करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर प्रकरणामध्ये विधी विभागाचे यांचे अभिप्राय घेणेकरीता दि. 12/12/2023 रोजी पत्र देण्यात आहे. त्यानुसार विधी विभागाने दि. 12/01/2024 रोजी सदर प्रकरणाबाबत सुनावणी घेऊन दोन्ही पक्षकारांचे कागदपत्रांची पडताळणी करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्राप्त आहेत. असे अभिप्राय दिले आहे.

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने सौ. रिधी एच. पुरस्वानी व श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा यांना दि. 13/02/2024 रोजी मा. कर निर्धारक व संकलक यांचे दालनात सुनावणीस उपस्थित राहणेकरीता कविण्यात आले. सुनावणी दरम्यान खालीप्रमाणे अधिकारी व पक्षकार उपस्थित होते.

1) श्री. मनोज गोकलानी, उप कर निर्धारक व संकलक, यु.क्र. 5 ते 8 - **हजर**
2) श्री. सुदर लांडगे, कर निरीक्षक, यु.क्र. 5 - **हजर**
3) **अर्जदार** - सौ. रिधी एच. पुरस्वानी - **हजर**
4) **गैरअर्जदार**- श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा - **हजर**

सदर सुनावणी दरम्याने सौ. रिधी एच. पुरस्वानी यांनी सदर मिळकतीसंदर्भात उल्हासनगर दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार कुमारी. रेशमा वरंदमल माखीजा ऊर्फ सौ. रिधी एच. पुरस्वानी व त्यांचे आई राधा वरंदमल माखीजा यांचे बाजुन निकाल लागला असे त्यांनी निवेदन दिले आहे. व न्यायालयीन आदेशाची प्रत सादर केली आहे.

सबब वरील सर्व बाबी पाहता सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे दिसुन येते, त्याअनुषंगाने मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती मालमत्ता क्र. 31CO005918900 अन्वय नोंद असलेल्या मिळकतीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे दिसुन येते. त्यानुसार उक्त मिळकतीकरीता श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा हि नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे **पेसुमल गोकलदास** या नावाची नोंद पुर्ववत करण्यात यावी.

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत-

1) सौ. रिधी एच. पुरस्वानी रा- बॅरेक नं. 823 रुम नं. 22/23,सेक्शन-17 उल्हासनगर-3

2) श्री. रामचंद प्रेमचंद माखीजा रा- 6 वा मजला, सिमरन डिलक्स, पुनेजा क्लासेस जवळ, फ्रेंड्स क्लासेस समोर, उल्हासनगर-3

3) मे. कोल्बो गृप, नगापुर,